**<u>-नियमित दिवाणी मुकदमा क्र.६२/२०२२ मधील निशाणी २५ खालील आदेश-</u>**

**<u>(रामचंद्र रामकृष्ण राणे व.८ वि. भरत बाबुराव परब व. १५)</u>**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार ज्ञानदेव अनंत राणे व संजय मोहन राणे यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० अन्वये प्रस्तुत दाव्याचे कामी त्यांना सामील करुन त्यांची बाजु मांडण्याची परवानगी मिळावी याकरीता दाखल केला आहे.

**०२.** अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे की, प्रस्तुत दाव्यातील वादी क्र. १ व २ यांचे अर्जदार क्र. १ व २ हे चुलत-चुलत पुतणे असून वादी क्र. ३ यांचे चुलत-चुलत भाऊ आहेत व प्रस्तुत दाव्यातील दावा मिळकतीकडे त्यांचा हक्कसंबंध आहे. त्यांनी पुढे असे कथन केले की, गांव मौजे कुंदे येथील श्री देव रवळनाथ पावणाई देवस्थान व पंचायतन बाबत वादीने प्रस्तुतचा दावा हक्कस्थापना व कायमच्या ताकिदीकरीता दाखल केलेला असून त्यामध्ये कै.बाबाजी दाजी राणे (पटेल) यांच्या वकलातील चार कुटुंबियांचे हितसंबंध आहेत. अर्जदार क्र. १ व २ यांना प्रामाणिकपणे प्रस्तुतचा दावा चालवायचा आहे. प्रस्तुत दाव्यामधील मानपाना संदर्भात सदर देवस्थानात सण, उत्सव व धार्मिक कार्यक्रम बंद ठेऊन मानपाना संदर्भात नुकसान होणारे आहे व भविष्यात न्यायाच्या दृष्टीने कामकाज वाढणार आहे. अर्जदार यांचा आठ आणे हिस्सा असल्याने तसेच त्यांचा सदर मानपानामध्ये हितसंबंध असलेने त्यांना प्रस्तुत दाव्याचे कामी प्रतिवादी करुन घेणे आवश्यक आहे. अन्यथा, ते आपली बाजु मांडण्याचा नैसर्गिक न्यायहक्कापासून वंचित रहाणार आहेत व त्यांचे अतोनात नुकसान होणारे आहे. सबब, त्यांना प्रतिवादी म्हणुन सामिल करुन घेणेत यावे व त्यांची बाजु मांडण्याची संधी देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

**०३.** प्रस्तुत अर्जास प्रतिवादीने नि. २९ येथे आपले म्हणणे देवून सदर अर्जास प्रखर विरोध दर्शविला. त्यांनी असे कथन केले की, अर्जदार यांचा सदर देवस्थानकडे कोणताही हक्क व अधिकार नाही. सबब, त्यांना प्रस्तुत दाव्याचे कामी पक्षकार करुन घेता येणार नाही. सबब, अर्जदार यांचा अर्ज खर्चासह

फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०४. प्रस्तुत अर्जास वादी यांनी नि.क्र. ३१ येथे आपले म्हणणे सादर करुन अर्जास हरकत घेतली आहे. त्यांनी असे कथन केले की, अर्जदार यांचा अर्ज कायद्याच्या कक्षेत नसून अपुर्ण माहितीच्या आधारे वादी यांना त्रास देण्याच्या हेतुने दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जदार यांनी त्यांचा आठ आणे हिस्सा आहे व प्रस्तुत दाव्यातील देवस्थानकडे त्यांचा हक्क आहे असा दर्शविणारा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा त्यांनी याकामी हजर केलेला नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०५. अर्ज व म्हणणे वाचून पाहीले. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार, वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०६. प्रस्तुतचा दावा वादी आणि प्रतिवादी यांचेविरुध्द गाव मौजे कुंदे येथील दावा विषयक देवस्थानकडे प्रमुख व मुख्य असा राजसत्तेचा हक्क व अधिकार राणे कुटुंबिय यांचा असून त्या संपुर्ण वर्षात साज–या केल्या जाणा–या प्रत्येक धार्मिक सण उत्सवाच्या वेळी प्रथम गणेश पुजन करण्याचा व उपरोक्त हक्क व अधिकार वादींना आहे अशी हक्कस्थापना होऊन मिळणेकरीता व प्रतिवादी विरुध्द कायम ताकिदीकरीता दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी प्रस्तुत दाव्याचे अनुषंगाने व वादी यांनी मागणी केलेल्या दादींशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध आहे असे दर्शविणारा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा याकामी हजर केलेला नाही. अर्जदार यांनी वादी यांचेशी नाते दर्शविणारी वंशावळ त्यांच्या कथनाच्या पुष्ठयर्थ याकामी हजर केलेली नाही. त्यामुळे अर्जदार यांचे नावातील साम्य वगळता वादी व अर्जदार यांचेतील नाते स्प्ष्ट होत नाही. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने, वादी तसेच प्रतिवादी यांनी दिलेल्या म्हणण्यानुसार अर्जदार यांचा प्रस्तुत दाव्याशी कोणताही हक्कसंबंध नाही असे कथन केलेले आहे. यावरुन, अर्जदार हे प्रस्तुत दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार (Proper or necessary parties) आहेत असे दिसून येत नाही. तसेच, त्यांनी प्रस्तुत दाव्यामध्ये त्यांचा हक्कसंबंध व हितसंबंध (Locus standi) प्रथमदर्शनी दाखवून दिलेला नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास

पात्र नाही. माझे उपरोक्त विवेचनावरुन, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**-: आदेश :-**

अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2024.10.23 11:23:59 +0530

दिनांक- २२/१०/२०२४ (प.रा.ढोरे )

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कुडाळ.